ePaper

## मान्सून अंदमानमध्ये दाखल, 27 मेला केरळात दाखल होण्याची शक्यता

| वर्ष - 8 | अंक - 280 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™

**आतील पानांत**


- विराट- अनुष्काचा प्लॅन काय ?
- विराटच्या निवृत्तीवर सचिन झाला भावुक
- ब्लॅकमेल सहन करणार नाही
- भारत-पाकिस्तान अमेरिकेनं मध्यस्थी...


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 13 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## काश्मीर प्रश्न हा भारत आणि पाकिस्तानपुरता मर्यादित

# पाकव्याप्त काश्मीर तर खाली करावंच लागेल!

## भारताने पुन्हा पाकिस्तानला स्पष्ट शब्दात आणि अमेरिकेला सडेतोडपणे ठणकावले !

। नवी दिल्ली / श्रीनगर ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**भारताने पुन्हा एकदा पाकिस्तानला स्पष्ट आणि सडेतोड शब्दात ठणकावले आहे. पाकिस्तानला पाकव्याप्त काश्मीर खाली करावेच लागेल, असे भारताने सुनावले आहे.**




### अमेरिकेची मध्यस्थी मान्य नाही !

काश्मीर आणि पाकव्याप्त काश्मीर हा प्रश्न भारत आणि पाकिस्तानपुरता मर्यादित आहे. त्यामध्ये अमेरिकेने नाक खूपसू नये, असे भारताने अत्यंत सडेतोडपणे अमेरिकेला सुनावले आहे.

### कठोर कारवाई नंतरही शहाणपण नाही..

पहलगाममध्ये झालेल्या मोठ्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानने ‘ऑपरेशन सिंदूर’ राबवले. पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे महत्त्वाचे नऊ अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले, तसेच भारताच्या या कारवाईमध्ये १०० हून अधिक दहशतवादी ठार झाले. ‘ऑपरेशन सिंदूर’ नंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव चांगलाच वाढला होता. पण, त्यानंतरही पाकिस्तानला शहाणपण आलेले नाही असेच दिसते.

### तात्पुरता युद्धविराम..

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीनंतर भारत आणि पाकिस्तानकडून युद्धविरामाची घोषणा करण्यात आली. मात्र, त्यानंतर अमेरिकेकडून काश्मीरच्या प्रश्नावर देखील भाष्य करण्यात आले होते. या सर्व पार्श्वभूमीवर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाची महत्त्वाची पत्रकार परिषद पार पडली.

### परराष्ट्र मंत्रालयाचे म्हणणे

या पत्रकार परिषदेमधून अमेरिकेला इशारा देण्यात आला आहे, तसेच पाकिस्तानला देखील ठणकावण्यात आले आहे. जम्मू काश्मीरबाबतचे प्रश्न हे द्विपक्षीय पद्धतीनेच सोडवले जाणार, कुणाचीही मध्यस्थी आम्हाला मान्य नाही, असे भारताने आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले आहे. तसेच पाकिस्तानला पाकव्याप्त काश्मीर खाली करावेच लागणार, असेही यावेळी स्पष्ट शब्दात सुनावण्यात आले आहे.

### पाकव्याप्त काश्मीर भारताचाच!

भारत आणि पाकिस्तानकडून युद्धविरामाची घोषणा झाल्यानंतर अमेरिकेकडून काश्मीरच्या प्रश्नावर देखील भाष्य करण्यात आले होते. भारताने पुन्हा एकदा काश्मीरबाबतची आपली भूमिका स्पष्ट केली आहे. काश्मीरच्या मुद्द्यावर इतरांची मध्यस्थी मान्य नाही, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेच्या उपराष्ट्रपतींमध्ये चर्चा झाली आहे. जम्मू काश्मीरमधील प्रश्न द्विपक्षीय चर्चेने सोडवले जातील, पाकिस्तानने पीओके खाली करावे, असे भारताने म्हटले आहे.

### व्यापाराचा मुद्दा आला कुठून ?

दरम्यान, युद्धविरामानंतर अमेरिकेकडून भारत आणि पाकिस्तानसोबतच्या व्यापारावर देखील भाष्य करण्यात आले होते. यावर देखील भारताने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. भारत आणि अमेरिकेच्या चर्चेमध्ये व्यापाराचा मुद्दा नव्हता, युद्धविरामामध्ये कुठेही व्यापाराचा मुद्दा नव्हता, असे भारताच्यावतीने स्पष्ट करण्यात आले आहे. पाकच्या गोळीचे उत्तर तोफगोळ्यानेच देऊ, असा इशाराही यावेळी भारताकडून पुन्हा एकदा पाकिस्तानला देण्यात आला आहे.

### एअर बेसचे झाले खिंडार..

रावळपिंडीमध्ये असलेलले नूर खान एअर बेस हे पाकिस्तानी वायु सेनेचे सर्वात मोठे एअर बेस होते. भारताने पाकिस्तानवर प्रत्युत्तर म्हणून केलेल्या हल्ल्यामध्ये नूर खान एअर बेस पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. एअर बेसची जागा एका खिंडाराने घेतली आहे. आमचे काहीही नुकसान झाले नाही, असे सांगणाऱ्या पाकिस्तानला चीनने फोटो प्रसिद्ध करून तोंडावर पाडले आहे.

### चीननेच दिला पाकिस्तानला मोठा दगा!

ज्या चीनला पाकिस्तान आपला सगळ्यात जवळचा मित्र मानतो, त्याच चीनने आता पाकिस्तानचा विश्वासघात केला आहे. पाकिस्तान चीनचे कौतुक करताना कधीच थकत नाही, मात्र, त्याच चीनमुळे पाकिस्तानवर मोठी नामुष्की ओढावली आहे. भारताने पाकिस्तानवर एअर स्ट्राईक केला याचे पुरावे आता जगासमोर आले आहेत आणि ते पुरावे देण्याचे काम चीनने केले आहे. चिनी सॅटेलाईट कंपनी असलेल्या ‘मिजार व्हिजन’ कडून भारतानं पाकिस्तानवर केलेल्या एअर स्ट्राईकचे छायाचित्रे जारी करण्यात आली आहेत. ज्यामध्ये भारताच्या हल्ल्यामध्ये पाकिस्तानच्या एअर बेसचे किती प्रचंड नुकसान झाले आहे, हे दिसून येत आहे.

# ‘पीएमपी’च्या प्रवासभाड्यात फेरबदल!

## फेररचनेमुळे पासच्या किमतींमध्येही बदल करण्यात आला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) कार्यक्षेत्रातील पीएमपीच्या प्रवासभाडे आणि स्टेजरचनेत फेरबदल करण्यात आला आहे. पीएमपी प्रशासनाने तसा निर्णय घेतला आहे. पीएमपीच्या वाहतूक विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.**



नव्या स्टेज रचनेनुसार एक ते पाच किलोमीटरासाठी दहा रुपये, पाच ते दहा किलोमीटरसाठी वीस रुपये, दहा ते पंधरा किलोमीटरासाठी तीस रुपये, पंधरा ते वीस किलोमीटरसाठी चाळीस रुपये, वीस ते पंचवीस किलोमीटरासाठी पन्नास रुपये, पंचवीस ते तीस किलोमीटरासाठी साठ रुपये, तीस ते चाळीस किलोमीटरासाठी सत्तर रुपये, चाळीस ते पन्नास किलोमीटरासाठी ऐंशी रुपये, पन्नास ते साठ किलोमीटरासाठी नव्वद, साठ ते सत्तर किलोमीटरसाठीसाठी १२० रुपये आणि सत्तर ते ऐंशी किलोमीटरसाठी १२० रुपये असा प्रस्तावित दर निश्चित करण्यात आला आहे.स्टेज रचना आणि तिकिट दर फेररचनेमुळे पासच्या किमतींमध्येही बदल करण्यात आला आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत चाळीस रुपयांचा दैनिक पास आणि नऊशे रुपयांचा मासिक पास यापूर्वी होता. तो रद्द करण्यात आला असून, पुणे आणि पिंपरी-चिंचवडसाठी सत्तर रुपयांचा एकच पास तर दीड हजार रुपयांचा मासिक पास करण्यात आला आहे.पीएमआरडीएच्या हद्दीतील दैनिक पास १२० रुपयांऐवजी १५० रुपयांचा करण्यात आला आहे. विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिकांच्या पासेस आणि पीएमआरडीएच्या मासिक पासमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, अशी माहिती पीएमपीच्या वाहतूक विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.नव्या स्टेज रचनेनुसार एक ते पाच किलोमीटरासाठी दहा रुपये, पाच ते दहा किलोमीटरसाठी वीस रुपये, दहा ते पंधरा किलोमीटरासाठी तीस रुपये, पंधरा ते वीस किलोमीटरसाठी चाळीस रुपये, वीस ते पंचवीस किलोमीटरासाठी पन्नास रुपये, पंचवीस ते तीस किलोमीटरासाठी साठ रुपये, तीस ते चाळीस किलोमीटरासाठी सत्तर रुपये, चाळीस ते पन्नास किलोमीटरासाठी ऐंशी रुपये, पन्नास ते साठ किलोमीटरासाठी नव्वद, साठ ते सत्तर किलोमीटरसाठीसाठी १२० रुपये आणि सत्तर ते ऐंशी किलोमीटरसाठी १२० रुपये असा प्रस्तावित दर निश्चित करण्यात आला आहे.स्टेज रचना आणि तिकिट दर फेररचनेमुळे पासच्या किमतींमध्येही बदल करण्यात आला आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत चाळीस रुपयांचा दैनिक पास आणि नऊशे रुपयांचा मासिक पास यापूर्वी होता.

### प्रवासभाडे आणि स्टेजरचनेत फेरबदल

तो रद्द करण्यात आला असून, पुणे आणि पिंपरी-चिंचवडसाठी सत्तर रुपयांचा एकच पास तर दीड हजार रुपयांचा मासिक पास करण्यात आला आहे.पीएमआरडीएच्या हद्दीतील दैनिक पास १२० रुपयांऐवजी १५० रुपयांचा करण्यात आला आहे. विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिकांच्या पासेस आणि पीएमआरडीएच्या मासिक पासमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, अशी माहिती पीएमपीच्या वाहतूक विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) कार्यक्षेत्रातील पीएमपीच्या प्रवासभाडे आणि स्टेजरचनेत फेरबदल करण्यात आला आहे. पीएमपी प्रशासनाने तसा निर्णय घेतला आहे.

# बालेवाडीत दोन दिवसीय “समर शॉपिंग अँड फूड फेस्टिवल!

## पुणे-पिंपरी-चिंचवडकरांसाठी फॅशन, फन, फूड–सगळं एकाच ठिकाणी!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उन्हाळ्याच्या सुट्यांचा आनंद घेण्यासाठी आणि शॉपिंगसोबत खाद्यप्रेमींसाठी एक खास पर्वणी ठरणारा “समर शॉपिंग अँड फूड फेस्टिवल” बालेवाडीत १७ आणि १८ मे २०२५ रोजी आयोजित करण्यात येत आहे. संध्याकाळी ४ वाजता सुरू होणारा हा फेस्टिवल रात्री १० वाजेपर्यंत सुरू राहणार असून, बालेवाडीत दोन दिवस खरेदी, खवय्यांसाठी विविध पदार्थांची चव आणि कुटुंबांसाठी करमणुकीचा मनसोक्त अनुभव मिळणार आहे.**




बालवाडीत १७ आणि १८मे दरम्यान “समर शॉपिंग अँड फूड फेस्टिवल”चे आयोजन करण्यात आले आहे. . या ठिकणी एकाच छताखाली सर्वाना आवडणाऱ्या आणि परवडणाऱ्या वस्तू खरेदी करता येणार आहेत. हा फेस्टिव्हल बालवाडी येथील, दसरा चौकातील, आठवडे बाजार ग्राउंडवर दुपारी ४.०० ते रात्री १० वाजेपाट्यांत पर्यंत सर्वासाठी खुला असणार आहे. बाणेर-बालेवाडीकरांना मनसोक्त खरेदी आणि लज्जतदार पदार्थांची मेजवानी एकाच छताखाली दोन दिवस मिळणार आहे.

### समर शॉपिंग फेस्टिवलमध्ये काय?

या “समर शॉपिंग फेस्टिवल” मध्ये प्रामुख्याने पैठणी, शोभेच्या वस्तू, ज्वेलरी, पंजाबी सूट्स, प्लाझो, फाब्रिक डिझाईनर साड्या, रेडी टू वेअर ब्लाऊज, लॉन्ग आणि शॉर्ट कुर्तीज, कॉटन मेन्स शर्ट्स आणि किड्स वेअर, लहान लहान मुलांसाठी लाकडी खेळणी बेडशीट, सुगंधी हॅन्डमेड सोप, ब्युटी प्रॉडक्ट्स, ऑरगॅनिक प्रॉडक्ट, शोभेच्या वस्तू, महिला बचत गटांनी तयार केलेल्या दर्जेदार वस्तू, लोणच्यांचे विविध प्रकार, दर्जेदार गावरान आणि घरगूती मसाले, पापड कुर्डई, शोभेच्या वस्तू, रेडी टू कुक फूड्स, मातीची भांडी, होम डेकोरच्या वस्तू, असे स्टॉल असणार आहेत. या परिसरातील लोक मोठ्या संख्येने या शॉपिंग अँड फूड फेस्टिवलला भेट देत असतात

### महिलांच्या उत्पादनांना प्रोत्साहन...

अश्या या शॉपिंग अँड फूड फेस्टिवलच्या माध्यमातून वेगवेगळ्या क्षेत्रातील स्वतःचा व्यवसाय सुरु करणाऱ्या महिला आणि व्यावसायिकांना एकत्र करत ग्रीन अँपल एक्सहिबिशन हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. तसेच व्यवसायावर असणाऱ्या कुटुंबांना आपल्या स्थानिक पातळीवरील उद्योगाला प्रोत्साहन देऊन त्यांना हातभार लावण्याचेही काम ग्रीन अँपल एक्सहिबिशन करत आहे. हिंजवडी आय. टी. जवळील बाणेर बालेवाडी परिसर आय. टी. रेसिडेन्स हब म्हणून झपाट्याने विकसित झाला आहे. या परिसरातील लोकांच्या रोजच्या जीवनातील गरज लक्षात घेऊन बाणेर-बालेवाडीकारणांसाठी खास संक्राती शॉपिंग फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. या फेस्टिवलच्या माध्यमातून व्यावसायिकांसाठी बाणेर-बालेवाडी परिसरात बिझिनेझ प्रोमोट करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. आपणही आपला बिझनेस या लोकांपर्यंत या फेस्टिवलच्या माध्यमातून पोहचवू शकता. तसेच या पुढेही ऑनलाईन सेवा देऊ शकता तरी या फेस्टिवल मध्ये सहभागी होण्यासाठी ९८५०३०४१६६ या नंबर वर संपर्क करावा.

### लहान मुलांसाठी खास आकर्षण...

या फेस्टिव्हल मध्ये लहान मुलांसाठी खास आकर्षण असणारे लांब पायाचे स्टिल्ट वॉकर, आणि जोकर यांची लहान मुलांच्या करमणुकीसाठी तसेच जम्पिंग आणि किड्स बॉऊन्सिंग असणार आहे. त्याच बरोबर थोरामोठांसाठी “ये शाम मस्तानी” हा सदाबहार गाण्यांचा प्रोग्रॅमही असणार आहे.

## पिंपरी-चिंचवडमधील बहुप्रतिक्षित आणि अटीतटीच्या निवड प्रक्रियेत काटे यांची बाजी

# भाजपाच्या शहराध्यक्षपदी शत्रुघ्न काटे!

## ‘महा ई न्युज’चे वृत्त ठरले खरे; महापालिका निवडणुकीत कस लागणार

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमधील बहुप्रतिक्षीत आणि अटीतटीची झालेली भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षपदाची निवड अखेर झाली. माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी या निवडीमध्ये बाजी मारली.**



“महाईन्यूज” ने काही दिवसांपूर्वीच दि.15 मेपूर्वी शहराध्यक्षपदाची निवड होईल, असे वृत्त दिले होते. तसेच, शत्रुघ्न काटे “डार्क हॉर्स” राहतील, असे वृत्तांकन केले होते. ते वृत्त खरे ठरले आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकीत नवनिर्वाचित शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांची भूमिका महत्त्वपूर्ण राहणार असून, पिंपरी-चिंचवडमध्ये भारतीय जनता पार्टीचे वर्चस्व कायम राखण्याचे आव्हान त्यांना पेलावे लागणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहर व जिल्हा अध्यक्ष (शहराध्यक्ष) कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. या पदासाठी 26 पदाधिकाऱ्यांनी मते दिली होती. सदाशिव खाडे, नामदेव ढाके, शत्रुघ्न काटे, संजय मंगोडेकर, विजय फुगे, राजू दुर्गे, शैला मोळक आणि सुजाता पलांडे यांची नावं चर्चेत होती. तर या पदाची माळ शत्रुघ्न काटे यांच्या गळ्यात पडली आहे. महापालिकेत तीन टर्म नगरसेवक असलेले काटे हे भाजप चिंचवडचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. विधानसभा निवडणूक कालावधीमध्ये शत्रुघ्न काटे यांच्याकडे शहर कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली होती.

मोरवाडी येथील भाजप मध्यवर्ती कार्यालयात शहराध्यक्ष निवडीची प्रक्रिया पार पडली होती. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी शहराध्यक्षपदासंदर्भात घोषणा केली. आगामी महापालिका निवडणुका विचारात घेता केंद्र आणि राज्यात सत्ता असलेल्या सत्ताधारी भाजपचा शहराध्यक्ष कोण होणार याला विशेष महत्व प्राप्त झाले होते. भाजप शहर समितीने त्यासाठी रितसर निवडणूक घेतली होती. .प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी सर्व परिस्थितीती आणि जेष्ठांचे मत जाणून मतदान पाहून काटे यांचे नाव जाहीर केले आहे.

जगताप यांच्या निधनानंतर त्यांचा राजकीय वारस म्हणून काटे यांचे नाव चर्चेत होते. मात्र अश्विनी जगताप यांचे नाव निश्चित झाले. पुढे विधानसभेला लक्ष्मण जगताप यांचे बंधू शंकर जगताप यांचे नाव पुढे येताच काटे यांच्यासह १३ माजी नगरसेवकांनी जगताप कुटुंबाच्या बाहेरचा उमेदवार द्यावा, अशी मागणी करत बंडखोरीचा इशारा दिला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी मध्यस्थी केली आणि काटे यांची शहर कार्यकारणीत कार्यकारी अध्यक्षपदी वर्णी लावण्यात आली. त्यावेळेस त्यांची शहराध्यक्षपदी निवड होणार हे जवळजवळ निश्चित झाले होते. त्यानुसार त्यांची शहराध्यक्षपदावर निवड करण्यात आली आहे.

### चिंचवडमध्ये ताकतीचा कार्यकर्ता

महापालिकेची आगामी निवडणूक जिंकायची तर स्थानिक भूमिपुत्राला संधी मिळावी, असा सूर होता. भाजप निष्ठावंतांपैकी अनेकांनी माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके यांच्या बाजूने कौल दिला होता. मात्र अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची ताकद असलेल्या पिंपरी चिंचवडमध्ये ताकतीचा कार्यकर्ता म्हणून काटे यांना संधी देण्यात आली आहे. एक सुसंस्कृत, उत्तम संघटक, अभ्यासू कार्यकर्ता म्हणून काटे यांच्याकडे पाहिले जाते. आगामी काळात चिंचवड विधानसभेचे दोन मतदारसंघ होणार आहेत. त्यावेळी संभाव्य उमेदवार म्हणून भाजप त्यांच्या नावाचा विचार करू शकेल, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

---

## पिंपरी चिंचवडचा दहावीच्या परीक्षेचा निकाल ९७.९७ टक्के

## शहरातील 213 शाळांपैकी 123 शाळांचा निकाल 100 टक्के

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी ऑनलाईन जाहीर करण्यात आला. परीक्षेत पिंपरी-चिंचवड शहरात मुलांपेक्षा मुली अव्वल ठरल्या. मुलांचा निकाल ९७.५५ टक्के तर मुलींचा निकाल ९८.४३ टक्के लागला आहे. शहरातील २१३ शाळांपैकी १२३ शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. शहराचा एकूण निकाल ९७.९७ टक्के लागला आहे.**




दहावीच्या परीक्षेसाठी पिंपरी-चिंचवड शहरातील २१३ शाळांमधून १० हजार ३३२ मुले तर ९ हजार ५८५ मुली अशी १९ हजार ९१७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यापैकी १० हजार २९६ मुले आणि ९ हजार ६७२ मुली अशा १९ हजार ८६८ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली. त्यातील १० हजार ४४ मुले तर ९ हजार ४२२ मुली असे एकूण १९ हजार ४६६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ४०२ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत.

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये ८ हजार ३८३ विद्यार्थ्यांना डिस्टिंक्शन मिळाले आहे. तर प्रथम श्रेणी ६ हजार ६८५, द्वितीय श्रेणी ३ हजार ५८७ आणि पास श्रेणी ८१० विद्यार्थ्यांना मिळाली आहे.

### सेल्फी आणि स्टेटस

दुपारी निकाल पाहिल्यानंतर पास झालेल्या विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला, तर सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव करणाऱ्या पोस्ट दिवसभर पाहायला मिळाल्या. काही विद्यार्थ्यांनी सेल्फी काढत सेलिब्रेशन करून, निकालाचा आनंद घेतला. तर निकालाचे स्टेटस अनेकांच्या मोबाईल क्रमांकावर झळकत होते.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### स्वतःला सुधारण्याचा प्रयत्न करावा

वास्तविक काही न करणे, आपण काही करतो आहोत किंवा आपल्याला काही करायचे आहे असे न वाटणे, हाच परमार्थ. देहाने, मनाने एकसारखी चळवळ करायची आपल्याला सवय लागली आहे. देहाला स्वस्थ बसायला लावणे कठीण, मनाला स्वस्थ बसायला लावणे हे त्यापेक्षा कठीण आणि देहाने कर्म करीत असताना मनाला स्वस्थ बसविणे हे अत्यंत कठीण. मनाला खरे म्हणजे स्वास्थ्य हवे; पण ते मिळविण्याकरिता साधन, म्हणजे प्रयत्न करणे जरुर आहे. मनाचे स्वास्थ्य बिघडायला कारणे तीन; एक, आपल्या इच्छेविरुद्ध गोष्ट होणे; दोन, मागच्या आपल्या बऱ्यावाईट कर्मांची आठवण होणे; आणि तीन, उद्याची काळजी लागणे. आता, जो तो आपल्या इच्छेप्रमाणे व्हावे असे म्हणणार, मग सर्व तुमच्या इच्छेप्रमाणे कसे चालतील ? तुमच्या इच्छेविरुद्ध गोष्टी होणारच. तेव्हा स्वास्थ्य बिघडू न देण्यासाठी, आपली इच्छाच नाहीशी करावी; अमुक गोष्ट मिळावी ही बुद्धीच नाही ठेवू; हाव सोडावी, लोकांची आस सोडावी; जे काही होते ते ' रामाच्या इच्छेने झाले ' म्हणावे. प्रत्येक गोष्ट ' रामाने केली ' म्हणणे, म्हणजे अखंड भगवंताच्या अनुसंधानात राहणे. आपला अहंपणा खरोखर किती खोल गेला आहे पाहा ! समोर दिसत असलेल्या गोष्टीकडे बेमालूम डोळेझाक करून, आपण आपल्या दोषांचे खापर बिनदिक्कत दुसऱ्यावर फोडायला तयार होतो. अमक्यातमक्याच्या नादाने आपला मुलगा बिघडला असे आपण म्हणतो, कारण आपलाच मुलगा खराब हे म्हणवत नाही ! ते म्हणण्याची लाज वाटते, म्हणून दुसऱ्याच्या मुलाला आपण वाईट म्हणतो. आपला मुलगा आपल्या डोळ्यांदेखत संगतीच्या योगाने एवढा बिघडतो, तर मग संगतीचा परिणाम केवढा असला पाहिजे ! संगतीचा परिणाम जर एवढा मोठा आहे, तर संतसंगतीत असताना आपल्यात सुधारणा का दिसू नये ? संतसंगतीने मग आपण निश्चित सुधारायला पाहिजे ! पण तसे तर दिसत नाही; मग नडते कुठे ? याचे मुख्य कारण म्हणजे, आपण स्वत:ला सुधारण्याचा प्रयत्नच करीत नाही. आपल्याला सर्व समजते, परंतु प्रयत्न करायला नको ! वासनेच्या जाळ्यातून बाहेर पडण्याचा आपण प्रयत्न करीत नाही. त्यामुळे वासनेतच आपण जन्माला येतो, आणि वासनेतच आपला अंत होतो. याकरिता एकच खात्रीचा उपाय आहे, आणि तो म्हणजे भगवंताला अनन्यभावाने शरण जाणे. " रामा, तुझ्यावाचून माझी यातून सुटका नाही. तू ठेवशील त्यात मी आनंद मानीन. तुझे प्रेम मला लागू दे. " असे कळकळीने रामाला सांगावे आणि सदैव त्याचे नाम हृदयात ठेवावे. तो उदार परमात्मा तुमच्यावर कृपा केल्याशिवाय राहणार नाही, याची खात्री बाळगा.

बोधवचन:- वासना मारायला भगवंताचे अधिष्ठान हा एकच उपाय आहे.

# मोदी द्वेषाने पछाडलेले, राजकारणी अन् मीडिया!



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**'ऑपरेशन सिंदूर' नंतर संपूर्ण देशातील वातावरण बदलले आहे. भारतीय जवानांनी आणि भारतीय सुरक्षा दलांनी जे शौर्य गाजवले, त्यावर भारतातील जनता खुश आहे. नतद्रष्ट दहशतवादी आणि भंपक पाकिस्तान यांचे संकट आले तरीही भारत त्यांना सडेतोड उत्तर देऊ शकतो, याची खात्री जनतेला पटली आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश सुरक्षित आहे, अशी ग्वाही देखील दिली जात आहे.**



### कपाळकरंट्यांना काय म्हणावे?

चारही बाजूंनी नरेंद्र मोदी यांची होत असलेली वाहवा, यांच्याबाबत निघत असलेले गौरवोद्गार सहन न होणारे शेकडो मोदी द्वेष्टे आपल्या देशात असून त्यांची टकळी आणखी जोमाने सुरू झाली आहे. अशा कपाळकरंट्या राजकारण्यांना आणि मीडियाला काय म्हणावे ? हे सुचेनासे झाले आहे. बरं, अशा मोदी द्वेष्ट्यांना समाज हिंगलत सुद्धा नाही, किंवा त्यांची समाजात किंमत शून्य असते हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे, पण रोज खालच्या थरावरील टीका करायची, हा त्यांचा नित्याचा उद्योग झाला आहे.

### आमचा 'अति हुशार' मीडिया..

महाराष्ट्रात बहुसंख्य पत्रकार आणि वृत्तवाहिनीवाले मोदींचा वैयक्तिक द्वेष करतात, हे जग जाहीर आहे. त्यामागील कारण माहीत नाही. कदाचित, काँग्रेस शासनाची, प्रत्येक गोष्ट मीडियाला विचारून करण्याची सवय असल्यामुळे हे होत असावे. मोदी यांनी २०१४ मध्ये भाजपाला केंद्रात स्पष्ट बहुमत मिळवून दिले, हे वास्तव अनेकांना स्वीकारणे कठीण झाले. नंतर २०१९ मध्ये मोदी पुन्हा पंतप्रधान होणार नाहीत अशी अटकळ आणि इच्छा अनेकांना होती.. पण तीही फोल ठरली! मीडियाचे लाडके ज्येष्ठ नेते शरद पवार यांना असे वाटत होते की, भाजपला दोनशेच्या आसपास जागा मिळतील आणि मोदी कमकुवत होतील. तेव्हा नितीन गडकरी किंवा राजनाथसिंह यांचे नाव पंतप्रधान म्हणून अनेकांच्या मनात रुंजी घालत होते. ती अटकळही बारामतीच्या कऱ्हा नदीमध्ये वाहून गेली.

### दुसऱ्यांदा मोदी, हे अनेकांना खुपले..

नरेंद्र मोदी दुसऱ्या वेळी पंतप्रधान झाले, ते अनेकांना खुपले आणि त्यांचा मानसिक आजार बळावत गेला. त्यांचा द्वेष करण्याचे मुख्य कारण म्हणजे ते पोषाख उत्तम पद्धतीने करतात. ते देशाचे पंतप्रधान आहेत. त्यांना नीटनेटके रहायला आवडते. पण, त्या संदर्भात देखील खूप लोकांना असूया वाटते. २०२४ मध्ये तरी मोदी सत्तेवरुन खाली खेचले जातील, अशी आशा बाळगणारे अनेक 'भटकंती आत्मे' देशभर फिरत होते. राजकीय पक्षांच्या लोकांची भूमिका समजू शकतो. पण, कारण नसताना मोदींना पाण्यात बघणारा एक मोठा वर्ग आहे आणि या वर्गातील अनेक लोक आता पासष्टी, सत्तरी ओलांडलेले आहेत. फारसा अभ्यास नाही, वाचन नाही, संदर्भ नाहीत, फक्त दुस्वास करीत राहण्याची अनेकांना सवय लागली आहे आणि हळूहळू त्याचे रूपांतर मनोविकृतीकडे होत आहे.

### अफलातून कार्यपद्धतीचे रसायन..

नरेंद्र मोदी यांची कार्यपद्धती आणि परिस्थिती हाताळण्याची कला ही प्रत्येकाला भुरळ पाडणारी आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपची घसरण झाली आणि २४० जागांवर येऊन देखील मोदी यांनी अत्यंत आत्मविश्वासाने सरकार स्थापन केले आणि ते आता स्थिरावले आहे. मनोविकृतांचा तो आजारी समूह चंद्राबाबू नायडू आणि नीतीशकुमार मोदींना कधीही टांग मारतील, अशी अपेक्षा बाळगून होता. या वर्गाला असे वाटत होते की, सगळे विरोधी पक्ष एकत्र येऊन मोदींना सत्तेच्या बाहेर खेचतील आणि देशाच्या राजकारणात काहीतरी अद्भुत घडेल ! पण मोदी हे रसायन वेगळे आहे.

### सत्तेची तयारी ३५ वर्षांपूर्वी..

तीस-पस्तीस वर्षे मागे गेलो, तर मोदी यांनी भाजपची सत्ता आणण्याची तयारी १९८९ मध्ये सुरु केली होती. त्या आधी म्हणजे १९८० मध्ये भाजपची स्थापना झाल्यानंतर गांधीवादी समाजवादाचे भूत भाजपच्या मानगुटीवर बसले होते. १९८९ च्या लोकसभा निवडणुकीत गुजरातमध्ये मोदींनी ते उतरवले. १९८६ मध्ये श्री रामजन्मभूमी आंदोलन सुरु झाले, तेव्हा मोदींनी ओळखले होते की भाजपची एकट्याची सत्ता आणायची असेल तर 'युती' वगैरे सगळे खोटे आहे. तेव्हा जनता दल होते आणि गुजरातमध्ये जनता दलाने १३ आणि भाजपने १२ जागा लढवल्या होत्या. मोदी आपण स्वतंत्र लढू म्हणत होते. पण 'युती' झाली. भाजपने लढवलेल्या सगळ्या जागा जिंकल्या. जनता दलाचे तीन उमेदवार पराभूत झाले. आता गुजरातमध्ये जनता दल नावाला शिल्लक नाही, हे लक्षात घ्यायला हवे !

### भव्य - दिव्य न आवडणारी जनता !

थोडक्यात काय, नरेंद्र मोदी यांची कोणतेही काम भव्य आणि व्यापक पद्धतीने करण्याची पद्धत अनेकांना आवडत नाही. पूर्वी, भाजपच्या किंवा त्या आधी जनसंघाच्या कार्यालयात चहा मिळाला तरी पुष्कळ, पण मोदी यांचे आगमन झाल्यानंतर ही परिस्थिती बदलली. दिल्लीत भाजपचे भव्य कार्यालय आहे. तिथे आता पाहुण्यांना किंवा कार्यकर्त्यांना पाहिजे ते अन्नपदार्थ सहजपणे उपलब्ध आहेत.

### नवे नेतृत्व, नवा भारत सहन होत नाही...

नरेंद्र मोदी आल्यापासून हे सगळे नियोजन वगैरे ज्यांनी कधी अनुभवले नसावे, त्यांना अनेक गोष्टी सहन होत नाहीत. काँग्रेसच्या काळातील त्याच रटाळ गोष्टी पुढे सुरु राहाव्यात, असे ज्यांना वाटत असते, ते लोक मोदींना पाण्यात बघतात.. मोदींचा दुस्वास करतात. पूर्वीच्या पारंपारिक पद्धतीमध्ये गुरफटलेल्या जुन्या जाणत्या कार्यकर्त्यांना म्हणूनच मोदी नको असतात. एखाद्या बँकेच्या शाखेत फर्निचर बदलायचे ठरवले तरी जुने कर्मचारी लगेच विरोध करतात, कारण त्यांना लाकडी फर्निचर मधील ढेकणांची सवय झालेली असते. टेबल हलवले आणि झुरळे भेदरून बाहेर पडली, तरी त्यांना कसेतरी होते.

### पारावर गप्पा मारणारी जुनी विचारसरणी..

खेड्यापाड्यात पारावर बसणारे किंवा पुण्यातील पर्वतीच्या जवळपास एखाद्या हॉटेलमध्ये बसून निरूद्योगी लोक ट्रंप ने असे करायला पाहिजे, मोदींनी तसे करायला पाहिजे, नरेंद्र मोदी चुकलेच, वगैरे बोलत असतात, त्याचीच ही पुढची आवृत्ती म्हणा ना ! काँग्रेस हा देशातील एक प्रमुख पक्ष आहे, पण मिसळ विकणारे एखादे दुकान म्हणजे नवी पिढी काळाबरोबर बदलते, पण, काँग्रेस पक्ष काही सुधारेल असे वाटत नाही. शिवाय अन्य कोणताही राजकीय पर्याय राष्ट्रीय पातळीवर समोर दिसत नाही. त्याचा परिणाम मोदींना पाण्यात बघणाऱ्या लोकांवर हरप्रकारे होतो आहे.

### नरेंद्र मोदी आगे बढो..

भारतातील हतबल झालेली काँग्रेस, भाजपा आणि संघ परिवारातील जुनी विचारसरणी त्याचप्रमाणे समाजामध्ये शून्य किंमत झालेला मीडिया यांच्या तोंडून आणि कृतीतून मोदी द्वेष ओसंडून वाहत आहे. पण, मोदींना संपूर्ण देशात पाठिंबा वाढतो आहे, आणि पुढील दहा वर्षे सर्व निवडणुका भारतीय जनता पक्ष हा विरोधकांचा सुपडा साफ करणार आहे, हे नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# भाजप जिल्हाध्यक्ष निवड वादामुळे लांबणीवर!

## ‘उत्तर’ व ‘दक्षिण’साठी विखे समर्थकांची फेरनिवड

।मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भाजपच्या अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी दिलीप भालसिंग तर उत्तर जिल्हाध्यक्षपदी नितीन दिनकर यांची आज, मंगळवारी फेरनिवड करण्यात आली. मात्र, अहिल्यानगर महानगर जिल्हाध्यक्ष पदासाठी नेत्यांसह त्यांच्या समर्थक इच्छुकांमध्ये एकमत न झाल्याने, या पदाची निवड प्रलंबित ठेवण्याची वेळ पक्षावर ओढावली. नियुक्त झालेले दोन्ही जिल्हाध्यक्ष पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे समर्थक मानले जातात. महानगर जिल्हाध्यक्ष पदावरही आपल्या समर्थकाची नियुक्ती करण्याचे विखे यांचे प्रयत्न आहेत, त्यातूनच ही निवड लांबणीवर पडल्याची चर्चा होत आहे.**



जिल्ह्यात भाजपचे महानगर, दक्षिण व उत्तर असे तीन जिल्हाध्यक्ष आहेत. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याने या पदांना महत्त्व प्राप्त झाले आहे. गेल्या २७ एप्रिलला शिर्डी येथे इच्छुकांची चाचपणी करून त्यांच्या नावांची शिफारस प्रदेश समितीकडे करण्यात आली होती. ही निवड अखेर प्रदेश निवडणूक निरीक्षक आमदार नैनसुख संचेती यांनी आज जाहीर केली.विधानसभा निवडणुकीवेळी जिल्हाध्यक्ष असलेले विठ्ठल लंघे यांनी शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश करत आमदारकी मिळवली व भाजपच्या जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. त्यामुळे जिल्हा उत्तर जिल्हा कार्याध्यक्षपदी नितीन दिनकर यांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. विखे समर्थक असे त्यांची ओळख आहे. त्यांना अल्प कालावधी मिळाल्याने त्यांची पुन्हा निवड करण्यात आली. दक्षिण जिल्हाध्यक्षपदी दिलीप भालसिंग यांची दीड वर्षांपूर्वी नियुक्ती करण्यात आली होती. ते मूळचे आमदार शिवाजी कर्डिले समर्थक. आमदार कर्डिले हे विखे समर्थक असल्यामुळे भालसिंग यांच्याकडे विखेसमर्थक म्हणूनच पाहिले जाते.महानगर जिल्हाध्यक्ष पदासाठी पक्षाचे निष्ठावान व विखे समर्थक यांच्यामध्ये रस्सीखेच होत आहे. या पदासाठी सचिन पारखी, बाबासाहेब वाकळे, धनंजय जाधव, बाबासाहेब सानप आदींची नावे चर्चेत होती. आता विचार भारतीचे अनिल मोहिते यांचेही नाव पुढे आले आहे. विखे गटाकडून त्यांचे नाव पुढे करण्यात आल्याचे सांगितली जाते. परिणामी जिल्हा संघटनेवरील सभापती राम शिंदे यांची पकड सैल होताना दिसत आहे.

### शिष्टमंडळे मुंबईकडे

त्यामुळे जिल्हा उत्तर जिल्हा कार्याध्यक्षपदी नितीन दिनकर यांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. विखे समर्थक असे त्यांची ओळख आहे. त्यांना अल्प कालावधी मिळाल्याने त्यांची पुन्हा निवड करण्यात आली. दक्षिण जिल्हाध्यक्षपदी दिलीप भालसिंग यांची दीड वर्षांपूर्वी नियुक्ती करण्यात आली होती. ते मूळचे आमदार शिवाजी कर्डिले समर्थक. आमदार कर्डिले हे विखे समर्थक असल्यामुळे भालसिंग यांच्याकडे विखेसमर्थक म्हणूनच पाहिले जाते.महानगर जिल्हाध्यक्ष पदासाठी पक्षाचे निष्ठावान व विखे समर्थक यांच्यामध्ये रस्सीखेच होत आहे. या पदासाठी सचिन पारखी, बाबासाहेब वाकळे, धनंजय जाधव, बाबासाहेब सानप आदींची नावे चर्चेत होती. आता विचार भारतीचे अनिल मोहिते यांचेही नाव पुढे आले आहे.

भाजपच्या महानगर जिल्हाध्यक्ष पदासाठी मोठी रस्सीखेच सुरू आहे. पक्षाचे निष्ठावान व विखे समर्थक यांच्यात चढाओढ सुरू आहे. त्यातूनच पक्षाचे दोन स्वतंत्र शिष्टमंडळे मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट घेण्यासाठी आज दुपारी रवाना झाली. एकमत होत नसल्यामुळे निवड किमान आठवडाभर तरी लांबणीवर पडेल अशी चर्चा होत आहे.जिल्ह्यात भाजपचे महानगर, दक्षिण व उत्तर असे तीन जिल्हाध्यक्ष आहेत. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याने या पदांना महत्त्व प्राप्त झाले आहे. गेल्या २७ एप्रिलला शिर्डी येथे इच्छुकांची चाचपणी करून त्यांच्या नावांची शिफारस प्रदेश समितीकडे करण्यात आली होती. ही निवड अखेर प्रदेश निवडणूक निरीक्षक आमदार नैनसुख संचेती यांनी आज जाहीर केली.विधानसभा निवडणुकीवेळी जिल्हाध्यक्ष असलेले विठ्ठल लंघे यांनी शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश करत आमदारकी मिळवली

# साईबाबा संस्थानाचे नवीन देणगी धोरण

## शिर्डीत साई भक्तांना आता देणगीच्या प्रमाणात सुविधा

।मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शिर्डी येथे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देश-परदेशातून येणारे साईभक्त मोठ्या श्रद्धेने साईबाबांच्या चरणी विविध प्रकारचे दान अर्पण करतात. या देणगीदार साईभक्तांच्या सेवा-सुविधांत वाढ करण्यासाठी सुधारित देणगी धोरणास संस्थानच्या तदर्थ समितीने मान्यता दिली आहे. संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडिलकर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.**




साईबाबा संस्थानचे प्रमुख चार उत्सव सोडून देणगीदार साईभक्तांना त्यांच्या देणगीच्या श्रेणीनुसार विविध प्रकारच्या सेवा-सुविधा, विशेषतः दर्शन-आरती सुविधा, बहुमान म्हणून शाल व फोटो, साई चरित्र, उदी-लाडू प्रसाद, भोजन पास इ. दिले जाणार आहेत. या धोरणातून साईभक्तांना अधिक चांगल्या सुविधा देण्याचा संस्थानचा प्रयत्न आहे. साईबाबांच्या समकालीन भक्तांच्या कुटुंबातील सदस्यांचाही योग्य सन्मान केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.या सुधारित सेवा-सुविधा पुढीलप्रमाणे- १० ते २५ हजारांपर्यंतचे दान देणाऱ्या साईभक्तास एका वेळेस कुटुंबातील ५ सदस्यांसाठी आरती पास, २५ ते ५० हजारांपर्यंतचे दान देणाऱ्यास दोन वेळेस कुटुंबातील ५ सदस्यांसाठी आरती व दर्शन पास, ५० हजार ते १ लाखापर्यंतचे दान देणाऱ्यास दान करतेवेळी कुटुंबातील ५ सदस्यांसाठी दोन व्हीआयपी आरती पास.रु. १ लाखावर दान देणाऱ्यास वर्षामध्ये २ व्हीआयपी आरती पास, तसेच नंतरच्या वर्षात त्यांच्या दानाप्रमाणे प्रति वर्ष १ व्हीआयपी आरती पास मिळेल. त्या वेळी सशुल्क दर्शन रांगेतून कुटुंबाच्या ५ सदस्यांसाठी तहहयात वर्षातुन १ वेळेस मोफत दर्शन सुविधा देऊन सन्मान केला जाईल. १० ते ५० लाखपर्यंत दान देणाऱ्यास देणगी प्रमाणात प्रत्येक वर्षी २ व्हीआयपी आरती पास व त्यांच्या कुटुंबातील ५ सदस्यांना तहहयात वर्षातून एक वेळेस मोफत प्रोटोकॉल दर्शन दिले जाईल.न देणाऱ्या साईभक्तास तहहयात ५ सदस्यांच्या कुटुंबासाठी प्रति वर्ष ३ व्हीव्हीआयपी आरती पास मिळणार आहे.

### सुविधेसाठी संगणक प्रणाली

सुधारित देणगी धोरणाच्या अनुषंगाने देणगीदारांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तंत्रज्ञान (सॉफ्टवेअर) विकसित करण्याचे काम झाल्यानंतर देणगीदारांची सर्व माहिती त्यामध्ये भरली जाईल. त्यानुसार प्रत्येक देणगीदाराला स्वतंत्र कार्ड दिल्यानंतर त्याआधारे त्यांना या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. संस्थानच्या अधिकृत वेबसाइटवर नोंदणी केल्यानंतर त्याची माहिती मिळेल. देणगीदारांनी शिर्डीला येण्याअगोदर १ महिना संस्थानला कळविल्यास त्यांना या सुविधेचा फायदा देण्यास संस्थान प्रशासन तत्पर असेल. या नवीन देणगी धोरणाची लवकरच अंमलबजावणी केली जाईल.त्यांनी या ट्वीटच्या माध्यमातून अत्यंत महत्त्वाची मागणी केली आहे.आदित्य ठाकरे यांनी पोस्टमध्ये म्हटलंय की, “मला आशा आहे की आज भारत सरकार जगाला हे स्पष्ट करेल की काश्मीर कोणत्याही चर्चेचा भाग नाही.

# ऑपरेशन सिंदूरला मोठं यश!

## » वायूदलाच्या हल्ल्यात पाकिस्तानी जवानांसह 50 जण ठार

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पहलगाममध्ये झालेल्या दहतवाद्यांनी केलेल्या हल्यानंतर भारतीय वायूदलाने या दहशतवादी संघटनांविरोधात मोठी मोहीम आखली होती. भारतीय वायूदलाने पाकव्याप्त कश्मीरमध्ये घुसून दहशतवाद्यांच्या तळांवर क्षेपणास्रे डांगली, या तळांवर बॉम्बवर्षाव केला. भारतीय वायूदलाने केलेलया या अचूक हल्ल्यांमध्ये पाकिस्तानी वायू दलाच्या पायाभूत सुविधांचा तब्बल २० टक्के भाग नुकसानग्रस्त झाला आहे. पाकिस्तानी वायू दलाची अनेक लढाऊ विमाने नष्ट झाली आहेत. भारतीय संरक्षण विभागातील अधिकृत सूत्रांनी मंगळवारी याबाबतची माहिती जाहीर केली.**

पाकिस्तानने सशस्त्र ड्रोन हल्ले केले. तसेच भारतीय लष्करी तळांवर व नागरी परिसरावर क्षेपणास्रे डांगली होती. त्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय वायू दलाने सरगोथा व भोलारीसारख्या पाकिस्तानी लष्करी तळांना लक्ष्य केलं येथील दारुगोळा साठवून ठेवलेल्या तळांवरही हल्ले केले. या भागात पाकिस्ताने वायूदलातील एफ-१६ व जे-१७ ही लढाऊ विमाने तैनात करण्यात आली होती. भारताच्या हल्ल्यात हीलढाऊ विमाने नुकसाग्रस्त झाली आहेत.सिंध प्रांतातील जामशोरो जिल्ह्यातील भोलारी येथील पाकिस्तानी वायू दलाच्या तळावर मोठा हवाई हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात स्वाड्रन लीडर उस्मान युसूफ व हवाई दलाच्या इतर चार जवानांसह ५० हून अधिक लोक ठार झाले आहेत. दरम्यान, या हल्ल्यात पीएएफची अनेक लढाऊ विमाने नुकसानग्रस्त झाली असल्याचं सुत्रांनी सांगितलं आहे.सूत्रांनी सांगितले की आधी पाकिस्तानने सशस्त्र ड्रोन हल्ले केले. तसेच भारतीय लष्करी तळांवर व नागरी परिसरावर क्षेपणास्रे डांगली होती. त्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय वायू



